पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय
पिंपरी, पुणे ४११ ०१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध रुग्णालये / दवाख्यान्यामध्ये वॉर्डबॉय व वॉर्डआया तात्पुरत्या स्वरुपात दरमहा एकत्रित मानधनावर भरणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत विविध रुग्णालये / दवाख्यान्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालीलप्रमाणे नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्गंत कोवीड १९ पार्श्वभूमीवर विविध रुग्णालये व दवाखाना / कोवीड केअर सेंटरकरीता दरमहा एकत्रित मानधनावर खालील तक्त्यात नमूद केलेली पदे हंगामी स्वरुपात ६ महिने कालावधीकरिता भरावयाची आहेत. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, आरक्षण , मानधन इ. तपशील व अटी-शर्ती खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदसंख्या | मानधन र.रु ( प्रतिमहिना) |
|---|---|---|---|---|
| १ | वॉर्डबॉय | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी ) आवश्यक | ३६ | १९४००/- |
| २ | वॉर्डआया | १) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण ( एस.एस.सी ) आवश्यक | ६७ | १९४००/- |

जात प्रवर्ग

| पदनाम | SC | ST | VJ(A) | NT(B) | NT(C) | NT(D) | SBC | OBC | EWS | SEBC | OPEN | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वॉर्डबॉय | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०२ | ०३ | ०५ | ०४ | १० | ३६ |
| वॉर्डआया | ०६ | ०२ | ०२ | ०४ | ०४ | ०२ | ०० | १५ | ०७ | ०५ | २० | ६७ |

१. सद्यपरिस्थिती लक्षात घेता संपुर्ण राज्यामध्ये लॉकडाऊनची परिस्थिती असून प्रवासाची व निवासाची कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे नमुद पदांकरीता स्थानिक उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.
२. प्रस्तुतची जाहिरात महापालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर ( www.pcmcinida.gov.in ) नोकरी विषयक या सदरामध्ये प्रसिद्ध करणेत आली असुन जाहिराती सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज उमेदवारांनी परिपुर्ण भरावा व अर्जासोबत एस.एस.सी परिक्षेचे प्रमाणपत्र व गुणपत्र , शाळा सोडल्याचा दाखला , जन्मदाखला , रुग्णालयीन कामाचा अनुभव प्रमाणपत्र इ कागदपत्रांच्या सांक्षाकित प्रतीसह अर्ज दिनांक १७/ ०७/ २०२० अखेर महापालिका मुख्य कार्यालयाचे प्रवेशद्वाराजवळ ठेवणेत आलेल्या पेटीमध्ये जमा करावेत.
३. अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांना कार्यालयात प्रवेश देण्यात येणार नाही. उमेदवारांचे प्राप्त अर्जाची छाननी केलेनंतर उमेदवांरानी एस.एस.सी परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या व रुग्णालयीन कामाचा अनुभव याचा विचार करुन गुणानुक्रमे उमेदवांराची यादी तयार करणेत येईल. व या गुणानुक्रम यादीनुसार उमेदवारांना रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील.
४. नियुक्ती देण्यात आलेल्या वॉर्डबॉय / वॉर्डआया यांना कोरोना १९ चे आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महापालिका निश्चित करेल अशा कोणत्याही रुग्णालयामध्ये / कोवीड केअर सेंटरमध्ये कामकाज करणे बंधनकारक राहिल.
५. उमेदवारास कोणताही प्रवासखर्च देय असणार नाही .
६. प्रस्तुतच्या एकत्रीत मानधनावर करावयाच्या नेमणुका ह्या पुर्णपणे तात्पुरत्या / हंगामी स्वरुपाच्या ६ महिने कालावधीसाठी आहेत. त्यामुळे अर्जदारास मनपामधील कोणत्याही पदावर कायमस्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क सांगता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.
७. ज्या दिवशी मनपास सदर पदांची आवश्यकता नसेल, अथवा सदरची पदे कायम अस्थापनेवर भरणेत आले नंतर उमेदवारांची कोणत्याही नोटिशी शिवाय मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.
८. उपरोक्त पदांकरीता उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना या जाहिराती सोबत देणेत आलेला आहे. तो डाऊनलोड करुन त्याची प्रिंट काढुन उपलब्ध करुन घ्यावा. मनपा कार्यालयात अर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

..२..

९. निवड केलेल्या उमेदवारांना महापालिकेने ठरवुन दिलेल्या अटी शर्तीनुसार व रुग्णालय प्रमुखांनी सोपविलेले कामकाज करणे बंधनकारक राहिल. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये आवश्यकतेनुसार ३ शिफ्टमध्ये कामकाज करावे लागेल.

१०. सदर पदासाठी वयोमर्यादा किमा १८ वर्ष पुर्ण व खुल्या प्रवर्गातील उमेदवांराना वय वर्षे ३८ व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना वय वर्षे ४३ राहिल.

११. सदर उमेदवारांना महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असणाऱ्या दवाखाना / रुग्णालय / कोविड केअर सेंटर या ठिकाणी कामकाज करावे लागेल.

१२. महापालिका विहित करेल त्या सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील.

१३. सदरच्या नेमणूका कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

( श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरीचिंचवडमहानगरपालिका
पिंपरी, पुणे४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकिय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/१/कावि/ ८१२ /२०२०
दि. ७ -०७-२०२०

<u>उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना</u>

फोटो

**प्रति,**

**मा. आयुक्त.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

**विषय – मानधन पध्दतीने भरावयाच्या ------------------------ या पदासाठी अर्ज**
**संदर्भ - वैद्यकिय विभागाकडील दिनांक ०७/०७/२०२० रोजीची जाहिरात**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी मनपाचे रुग्णालय/दवाखान्यामध्ये मानधन पध्दतीने भरावयाच्या---------------------------------या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

| **अ.क्र.** | **तपशील** | **माहिती** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | **आडनाव** | | | **नाव** | | | **वडील / पतीचे नाव** | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | | | | | | | | |
| ३ | ई-मेल | | | | | मोबाईल क्र. | | | | | |
| ४ | जन्मतारीख | | | | | | | | | | |
| ५ | लिंग | पुरुष | | | स्त्री | | | | | | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | | | | | होय / नाही | | | | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | | | | पदनाम - | | | | | |
| ७ | जात - | | | | जातीचा प्रवर्ग - | | | | | | |
| | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | SEBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | | |
| ८ | शैक्षणिक अर्हतेचा तपशील | | | | | | | | | | |
| | **शैक्षणिक अर्हता** | **उत्तीर्ण वर्ष** | | | **मिळालेले गुण** | | | **टक्केवारी** | | | |
| | एस.एस.सी | | | | | | | | | | |
| ९ | अनुभवाचा तपशील | | | | | | | | | | |
| | **अ.क्र.** | **संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक** | | | | | | **पदनाम** | | **कालावधी** | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील असून ६ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात मनपातील कायम अस्थापनेवर नेमणुकीबाबत कोठेही वकोणताही दावा दाखल करणार नाही.तसेच सद्यस्थितीत मी या महापालिकेमध्ये मानधन स्वरुपात कार्यरत नाही.वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे.मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्यावर या माहितीच्या आधारे महापालिका मानधनाचे सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीप्रक्रियेच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ -** **अर्जदाराची सही -**

**दि. / /२०** **अर्जदाराचे नाव ---------------------------------------**

**सहपत्रे-** अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
१) एस.एस.सी प्रमाणपत्र व गुणपत्रक २) रुग्णालयीन कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ३) जात प्रमाणपत्र
४) जन्म प्रमाणपत्र ५) शाळा सोडल्याचा दाखला ६) आधारकार्ड / पॅनकार्ड